# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

जानेवारी - एप्रिल २०१४ वर्ष ७ अंक १ पृष्ठ ८ रु. २/-

## श्रवणाची कला, पाहण्याची कला आणि शिकण्याची कला विलक्षण स्पष्टता आणते

श्रवणाची कला, पाहण्याची कला आणि शिकण्याची कला यासंबंधी आपण नेहमीच बोलत आलो आहोत. श्रवणाची कला म्हणजे अशा प्रकारे श्रवण करणे की मग प्रत्येक गोष्ट स्वाभाविकपणे तिच्या नेमक्या जागी ठेवली जाते. कला या शब्दाचा अर्थ तो आहे – वस्तु त्यांची स्वभावत: जी जागा असते तिथे ठेवणे. पाहण्याची कला म्हणजे विना विपर्यास निरीक्षण करणे, अर्थातच विपर्यास होतो तिथे निरीक्षण संभवतच नाही. जर आपण पक्षाला चुकीने सर्प समजलो तर मग ते स्पष्टपणे पाहणे नसते. त्याचप्रमाणे स्वच्छपणे पाहणे, आकलनामध्येच नितांत स्पष्टता असणे, म्हणजेच तिथे विपर्यासाला थारा न देणे – कोणत्याही प्रकारचा हेतू, उद्दिष्ट किंवा दिशा यामुळे निर्माण होणारा विपर्यास, बरोबर? जाऊ या का पुढे? आपण परस्परांबरोबर साथीसोबतीने विचार करत आहोत ना? आणि शिकण्याची कला म्हणजे निव्वळ ज्ञान गोळा करणे नव्हे, अर्थात कोणतेही काम कौशल्याने करण्यासाठी त्याचीही गरज आहे. परंतु संचयाविना शिकणेही असू शकते, बरोबर? हे थोडेसे अधिक कठीण आहे. दोन प्रकारचे शिकणे असते. अनुभवामधून, पुस्तकातून, शिक्षणाच्या माध्यमातून पुष्कळ ज्ञान गोळा करणे, एकत्र करणे आणि ते ज्ञान कुशलतेने वापरणे. हे एक प्रकारचे शिकणे असते. दुसऱ्या प्रकारचे शिकणे असते जिथे संचय करणे कधीही संभवत नाही. म्हणजेच – हे काळजीपूर्वक ऐका – म्हणजे जे अत्यंत आवश्यक आहे त्या गोष्टींशिवाय इतर कोणत्याही गोष्टींची स्मृतीमध्ये नोंद न करणे. आपण एकमेकांबरोबर आहोत ना? म्हणजे जेव्हा, तुम्ही कुठल्याही प्रकारचे ज्ञान शिकत असता तेव्हा तुमचा मेंदू त्याची नोंद करतो, ज्ञान गोळा करतो, ते साठवून ठेवतो आणि त्या साठवलेल्या ज्ञानामधून अगदी कुशलतेने किंवा अकुशलतेने कृती करत असतो.

परंतु दुसऱ्या प्रकारचे शिकणे असते ज्याच्यामध्ये तुम्हाला इतके पूर्णपणे अवधान येते की जे अत्यंत आवश्यक असेल त्याचीच तुम्ही नोंद करता आणि दुसऱ्या कशाचीही नाही. तुम्हांला हे समजतंय ना? म्हणजे मग मन कधीही अस्थिर नसते, अतिरिक्त ज्ञानाने विस्कळीत झालेले नसते. मला शंका आहे की तुम्हाला हे सर्व समजतंय का. आपण यामध्ये अधिक खोल शिरू या.

तेव्हा प्रज्ञा जागृत होण्यामध्ये या तीन गोष्टी आवश्यक आहेत – श्रवणाची कला, तुम्हाला जे काही म्हणायचे आहे ते अचूकपणे फक्त शब्दानेच सांगणे नव्हे तर शब्दाशिवाय संवाद करणे आणि तुम्ही कोणत्याही विपर्यासाशिवाय ऐकले पाहिजे– ती श्रवणाची कला असते. पाहण्याची कला म्हणजे कोणत्याही हेतूशिवाय, कोणत्याही दिशेशिवाय किंवा कोणत्याही प्रकारच्या इच्छेशिवाय स्पष्टपणे निरीक्षण करणे. केवळ निरीक्षण करणे. बरोबर? आणि मग शिकण्याची कला असते. ज्ञानाचा संचय करणे म्हणजेच कुशलतेने कृती करण्यासाठी आवश्यक अशा सर्व गोष्टींची नोंद करणे, मात्र मानसिक प्रतिसाद किंवा मानसिक प्रतिक्रियांची नोंद न करणे, म्हणजेच जेव्हा कृती वा कौशल्य आवश्यक असते तेव्हा मेंदू स्वत:च त्या ज्ञानाद्वारे कृती करतो आणि नोंदी न करण्याचे स्वातंत्र्य मेंदूला असते. बरोबर? मला शंका आहे तुम्हाला हे सगळं समजतंय का. हे फारच कठीण, दुर्धर आहे. इतके पूर्णपणे अवधान पाहिजे की तुम्ही जे अत्यंत आवश्यक आहे त्याचीच नोंद करता आणि ज्याची जरूरी नाही त्याची बिलकुल नोंद करीत नाही. कोणीतरी तुमचा अपमान करतो, कोणीतरी तुमची स्तुती करतो, कोणीतरी तुम्हाला अमुक-तमुक म्हणतो – काही नोंद होत नाही, बरोबर? यामुळे आत्यंतिक स्पष्टता प्राप्त होते. फक्त कौशल्याच्या संदर्भातील स्पष्टताच नाही – जी ज्ञानाची निष्पत्ती आहे. कालच मी त्याचा विचार करीत होतो, मी त्याविषयी बोलणार होतो – पण राहून गेले. नोंद करणे आणि नोंद न करणे. मग तेथे मानसिक 'मी'ची घडण नसते. 'स्व'ची रचना – जडणघडण. जेव्हा अनावश्यक गोष्टींची नोंदणी होत असते तेव्हाच 'स्व'ची घडण होत असते. म्हणजेच नावाला महत्त्व देणे, एखाद्याचे नाव, रूप, एखाद्याचा अनुभव, एखाद्याची मते, निष्कर्ष हे सर्व त्या 'स्व'ला ऊर्जा पुरवत असतात, ज्यामुळे नेहमीच विपर्यास होत राहतो, आपण पुढे जाऊया का?

तेव्हा जिथे शिकण्याची कला असते, जिथे प्रत्येक गोष्ट तिच्या स्वाभाविक जागी ठेवली जात असते आणि म्हणून कोणत्याही निष्कर्षाशिवाय, मताशिवाय ऐकणे – हे सारे घटक विपर्यास निर्माण करीत असतात त्यांच्याशिवाय ऐकणे घडत असते आणि त्या श्रवणामध्येच आपल्याला सत्य काय आहे आणि असत्य काय आहे त्याचे दर्शन होते. कोणत्याही प्रयत्नाशिवाय, कारणाशिवाय जेव्हा श्रवणाकडे प्रत्यक्ष अवधान दिले जाते, तेव्हा ते अवधानच जे पूर्णपणे वास्तव नाही, सत्य नाही ते बाजूला सारत असते, बरोबर? आणि पाहण्याच्या कलेबद्दल – जेव्हा आपण निष्कर्षासह पाहतो, स्वत:च्या मतांसह, ठाम मते धारण करून, श्रद्धेसह पाहतो तेव्हा तुम्ही संभवत: स्पष्टपणे पाहू शकत नाही, हे उघडच आहे. आणि शिकण्याची कला – जीवनामध्ये कुशलतेने कृती करण्यासाठी ज्ञान जमा करण्यास शिकणे, परंतु दुसरी कुठलीही नोंद करण्याच्या प्रकारातून विपर्यास निर्माण होतो, कुशलतेला अवास्तव महत्त्व दिले जाते आणि म्हणून त्यामध्ये यांत्रिकता येते. मला आशा आहे की, तुम्हाला हे समजतंय. तेव्हा श्रवणाची कला, पाहण्याची कला आणि शिकण्याची कला विलक्षण स्पष्टता आणते आणि म्हणून त्या स्पष्टतेतून शाब्दिक संवाद साधता येतो.

*The Wholeness of Life*, सानेन १९७७, भाषण ३

# निरीक्षणातून शिकण्याची एक वेगळी कृती

शिकले आणि शिकवले जाणे यामध्ये फार मोठा फरक आहे आणि मला असे वाटते की या दोन्हींमधील फरक समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. शिकण्यासाठी मोठी विनम्रता लागते. कारण शिकणे ही अगदी कठीण, दुर्धर प्रक्रिया आहे आणि मनाचा शिकण्याकडे कल नसतो. आपल्यापैकी बहुतेक जणांना केवळ शिकवले जाते आणि ज्या व्यक्तीला केवळ शिकवलेच जाते ती व्यक्ती शिकण्यास असमर्थ ठरते. शिकण्यामध्ये, जी सततची प्रक्रिया असते तिथे शिक्षक आणि विद्यार्थी (ज्याला शिकविले जाते) ह्यांच्यामध्ये भेद नसतो. गुरू आणि शिष्य अशी विभागणी नसते. तिथे फक्त शिकणे असते.

ज्यावेळी मन कोणीतरी शिकवणार आहे म्हणून वाट बघत असते आणि स्मृती म्हणून ज्ञान गोळा करत असते तेव्हा तिथे शिकणे नसते. जेव्हा शिकवले जाते तेव्हा त्या प्रक्रियेमध्ये प्रयत्नांची जरूरी नसते आणि फक्त स्मृतीची मशागत असते. तिथे शिक्षक आणि शिष्य असतो, एक ज्याला माहीत असते आणि दुसरा ज्याला शिकवले जात असते – त्याला माहीत नसते अशी धारणा असते आणि हा फरक जीवनभर जोपासला जातो. मला वाटते आपण दोघांनी सुरुवातीपासूनच या भेदामधील खोटेपणा समजून घ्यावा हे शहाणपणाचे ठरेल आणि आपल्यामध्ये असे खरे संबंध प्रस्थापित व्हावेत की तिथे शिक्षक आणि विद्यार्थी (ज्याला शिकवले जाते) असा भेद नसेल, परंतु फक्त शिकणे असेल. आणि शिकण्यासाठी फार मोठ्या विनम्रतेची गरज असते. जो मनुष्य म्हणतो की मला माहीत आहे, त्याला प्रत्यक्षात काही माहीत नसते. त्याला फक्त जो भूतकाळ आहे – जो मृतवत असतो – तोच माहीत असतो. परंतु जो मनुष्य दररोज शिकत असतो आणि केवळ गोळा करत नसतो तिथे शिकवणारा नसतो, तसेच ज्याला शिकवले जाते तोही नसतो. तिथे फक्त क्षणोक्षणी सत्याचे आकलन करून घेणेच असते.

तेव्हा तुम्ही आणि मी हे समजून घेतले पाहिजे की आपण दोघेजण मिळून हा प्रवास करत आहोत, ज्यामध्ये पाहणे, श्रवण करणे आणि शिकणे आहे; कारण जर आपल्याला ते समजले तर आपल्या सभोवती असलेल्या प्रत्येक गोष्टीपासून आपण शिकत राहू. केवळ एका विशिष्ट पुस्तकातून किंवा शिक्षकाकडून किंवा धर्मामधून शिकणार नाही. जगण्याची संपूर्ण प्रक्रिया म्हणजेच धर्म असतो. आपण शिकणे म्हणजे काय हे समजून घेऊ तेव्हा आपण स्वत:च हे शोधून काढू. परंतु आपल्यापैकी बहुतेक जणांना हे समजणे कठीण जाते कारण आपल्याला कोणीतरी शिकवले पाहिजे असे वाटत असते. मग तिथे आपण जबाबदार नसतो, तिथे कष्ट नसतात – तुम्हाला माहीत आहे आणि मला माहीत नाही, तुम्ही शिकवता आणि मी केवळ स्वीकारत असतो. शिकून घेण्यामध्ये एक प्रकारची सुरक्षिततेची भावना असते. तिथे शोध घेणे नसते, चौकशी नसते, संशोधन करणे नसते आणि मी शिकवणारा आहे आणि तुम्ही शिकणारे आहात या दृष्टीने जर तुम्ही हे भाषणदेखील ऐकत असाल तर ती मोठी चूक ठरेल. किंवा मी काही चमत्कारसदृश किंवा असाधारण असे काहीतरी तुम्हाला सांगणार आहे अशी तुमची भावना असेल तर ती चूक ठरेल. परंतु जर आपण दोघांनी मिळून खऱ्याखुऱ्या विनम्रतेने ही जगण्याची प्रक्रिया समजून घेण्यास सुरुवात केली तर त्या आकलनातूनच बदल घडण्याचा चमत्कार असतो.

तर, तिथे ऐकणे असते, निरीक्षणातून शिकण्याची एक वेगळी कृती. ते शिकणे म्हणजे संचय करणे नसते. वाहते पाणी कधी साचून राहत नाही – सतत गतिमान असते. आणि जेव्हा ही संपूर्णपणे ऐकण्याची प्रक्रिया असते, कधीही कुठल्याही अनुभवामधून गोळा न करता, जे घडले आहे त्याची कधीही नोंद न करता – आणि हे तेव्हाच घडू शकते जेव्हा तुम्ही अतिअत्यंत बारकाईने निरीक्षण करत असता आणि त्यामुळे मेंदू जो अधिकाधिक संस्कारबद्ध झाला आहे, अधिकाधिक यांत्रिक, मर्यादित झाला आहे, तो ह्या मर्यादेचा बिमोड करू शकतो.

*The Mirror of Relationship*, मुंबई १९५७, भाषण १

## शिकण्यासाठी मन शांत पाहिजे

काहीही नवीन शिकण्यासाठी तुम्ही स्वत:वरून सुरुवात केली पाहिजे. पूर्णपणे रिक्त होऊन हा प्रवास तुम्ही सुरू केला पाहिजे. विशेषत: ज्ञानापासून – माहितीपासून मुक्त असणे. कारण श्रद्धा आणि ज्ञान या माध्यमातून अनुभव घेणे सोपे असते. ते अनुभव केवळ स्वत: कल्पित केलेले चित्र असते. आणि म्हणून ते पूर्णत: भ्रामक, खोटे असते. जर तुम्हाला स्वत:लाच काय नवीन आहे हे शोधून काढायचे असेल, तर मग जुन्याचे ओझे बाळगणे योग्य होणार नाही. विशेषत: ज्ञान – माहिती – दुसऱ्याबद्दलचे ज्ञान, मग तो कितीही मोठा असू दे, ते योग्य होणार नाही. तुम्ही या माहितीचा तुमचा स्वत:चा मोठेपणा, तुमची स्वत:ची सुरक्षितता वाढविण्यासाठी उपयोग करता आणि तुम्हाला खात्री हवी असते की बुद्ध किंवा ख्रिस्त किंवा कोणी 'क्ष' व्यक्ती यांच्यासारख्याच अनुभवाचा प्रत्यय तुम्हाला आला आहे. परंतु जो मनुष्य स्वत:चे संरक्षण माहितीच्या आधारे करत असतो तो निश्चितच सत्यशोधक नसतो.

सत्याचा शोध घेण्यासाठी मार्ग उपलब्ध नाही. जेव्हा तुम्हाला एखाद्या नवीन गोष्टीचा शोध घ्यायचा असतो, जेव्हा तुम्ही कोणताही प्रयोग करीत असता, तेव्हा तुमचे मन अगदी शांत असले पाहिजे. खरं की नाही? जर तुमच्या मनात गर्दी झालेली असेल, घटना, माहितीने मन भरून गेलेले असेल, तर ते घटक नवीन काही शोधण्यात अडथळा आणण्याचे काम करतात. मन खूप महत्त्वाचे झाले आहे ही आपली सर्वांची समस्या झाली आहे. त्याची सूचकता–वर्चस्व इतके असते की आपण जेव्हा एखादा नवा अनुभव घेतो तेव्हा आधीपासून माहीत असलेल्या गोष्टींचा, ज्ञानाचा सतत अडथळा येत राहतो. म्हणूनच जे कालातीत आहे त्याचा शोध घेणाऱ्या व्यक्तींसाठी ज्ञात गोष्टी आणि शिकणे हे अडथळेच आहेत.

*The Book of Life*, जानेवारी ९
*Daily Meditations with J. Krishnamurti*

# त्या तीन कला

प्रत्येक माणसाला हे स्वत:रुपी पुस्तक वाचण्यासाठी ते पुस्तक काय सांगतंय हे ऐकण्याची विद्या आकलन झाली पाहिजे. ऐकणे म्हणजे त्या पुस्तकाचा अन्वयार्थ लावणे नव्हे. केवळ तटस्थपणे पाहणे - जसे तुम्ही एखाद्या ढगाकडे पाहाल. त्या ढगाच्या अवस्थेत तुम्ही कोणताही बदल करू शकत नाही. अथवा वाऱ्यावर डोलणाऱ्या माडांच्या झावळ्या, किंवा सूर्यास्ताचे सौंदर्य, तुम्ही ते बदलू शकत नाही. म्हणूनच ते पुस्तक काय सांगत आहे ते ऐकण्याची कला प्रत्येकाकडे असणे आवश्यक आहे. ते पुस्तक तुम्हीच आहात, ते सर्व काही उलगडून दाखवेल.

आणखीही एक कला आहे - बघण्याची, निरीक्षण करण्याची. जेव्हा तुम्ही स्वत:रुपी पुस्तक वाचत असता तेव्हा तुम्ही आणि पुस्तक एकच असता. पुस्तक आणि त्याचा वेगळा वाचक अशी भिन्न नसतात. तुम्हीच ते पुस्तक असता.

एक कला अजूनही आहे. ती म्हणजे ज्ञान मिळविण्याची, शिकण्याची. संगणक शिकू शकतात, त्यांना आज्ञावली देता येते आणि त्यानुसार सांगितलेल्या गोष्टी ते पुन:पुन्हा करू शकतात. आपण प्रथम अनुभवतो, माहिती संकलित करतो, मेंदूत साठवतो आणि मग स्मरणरुपाने विचार अवतरतात आणि त्यातून कृती जन्म घेते. त्या कृतीतून तुम्ही शिकता. शिक्षण म्हणजेच अधिक माहिती मिळविणे. कोणताही सजग, सतर्क मेंदू सतत हेच काम करीत असतो. एखाद्या संगणकाप्रमाणे. अनुभव, माहिती, स्मरणशक्ती, विचार, कृती- ही साखळी सतत सुरू असते, हीच शिक्षणाची प्रक्रिया, अनुभवातून ज्ञान. हीच संपूर्ण मानवजातीची गोष्ट आहे. सतत आव्हान आणि त्या आव्हानाला दिलेला प्रतिसाद आणि ते पुस्तक म्हणजेच संपूर्ण मानवजातीचे ज्ञान म्हणजेच तुम्ही स्वत:!

मला ठाऊक आहे की बहुधा तुम्ही सगळे खूप शिक्षित, खूप विद्वान आहात पण मी हे सर्वकाही अत्यंत सोप्या भाषेत सांगतो आहे. शब्द म्हणजेच सर्वस्व नव्हे. कृपा करुन लक्षात ठेवा - शब्द म्हणजे सर्वस्व नव्हे. प्रतीक हे प्रत्यक्षाहून वेगळे असते. म्हणून मी म्हणतो त्या तीन कला बघण्याची, ऐकण्याची आणि शिकण्याची. ज्ञात गोष्टींपासून मानव मुक्त राहू शकत नाही, म्हणून शिकण्याही कला यांत्रिक होते. शिकण्याही कला या शब्दांचा अर्थ संपूर्णपणे वेगळा आहे. शिकणे म्हणजे (मानवी) माहितीच्या, ज्ञानाच्या मर्यादांची चौकशी आणि हालचाल. आता या तीन प्रक्रियांच्या मदतीने-ऐकणे, बघणे (निरीक्षण करणे) आणि शिकणे-आपण सगळे मिळून हे आयुष्याचे पुस्तक वाचूया. तुम्ही माझ्याबरोबर हे पुस्तक वाचीत आहात पण मी तुमचे पुस्तक वाचीत नाही. आपण सगळे मिळून हे माणसाच्या आयुष्याचे पुस्तक - जे तुम्ही, वक्ता, आणि संपूर्ण इतर मानवजात आहे - त्या पुस्तकाचे वाचन करीत आहोत. कृपा करुन इथे लक्ष द्या. आपण स्वत:रुपी पुस्तकाचे वाचन कसे करावे, हे जर आपल्याला ज्ञात असेल तर सर्व संघर्ष, सर्व दु:ख संपतील. केवळ अशा प्रकारचे धार्मिक मन-श्रद्धाळू नव्हे, केवळ धार्मिक विधी पाळणारे नव्हे तर खरोखरीच मुक्त मन. हे पुस्तक संपूर्ण वाचल्यानंतर केवळ अशाच मनाला सत्याचा आशीर्वाद लाभेल.

*जीवन-पुस्तक*, कोलंबो, ९ नोव्हेंबर १९८०

## प्रयत्नाशिवाय ऐकणे

तुम्ही आता माझे बोलणे ऐकत आहात. तुम्ही लक्ष देण्यासाठी प्रयत्न करीत नाही आहात. तुम्ही फक्त ऐकत आहात. आणि तुम्ही जे ऐकत आहात त्यामध्ये जर सत्य असेल तर तुम्हाला आढळून येईल की तुमच्यामध्ये एक असाधारण असा बदल घडून येत आहे, जो बदल तुम्ही पूर्वी मनात योजलेला नाही किंवा इच्छिलेला नाही - परिवर्तन, संपूर्ण क्रांती - ज्यामध्ये सत्य हाच गुरू असतो आणि ती तुमच्या मनाची निर्मिती नसते. आणि जर मी असे सुचवले की तुम्ही अशाच प्रकारे प्रत्येक गोष्टीचे श्रवण करा, फक्त मी काय म्हणतो आहे तेवढेच नव्हे, तर इतर जणही जे काही म्हणत आहेत ते, पक्षांचे गुंजन, रेल्वेची शिटी, जवळून जाणाऱ्या बसचा आवाज तुम्ही ऐकाल तर तुम्हाला असे समजून येईल की तुम्ही जेव्हा प्रत्येक गोष्टीचे अधिक श्रवण कराल तेव्हा तेथे तुम्हाला शांती जाणवेल आणि ती शांती आवाजाने भंगणारी नसेल. फक्त जेव्हा तुम्ही कशाला तरी विरोध करीत असता तेव्हा तुमच्यामध्ये आणि तुम्ही जे ऐकणार असाल त्यामध्ये अडसर निर्माण होतात. तसेच जेव्हा तुम्हाला ऐकायचे नसते तेव्हा आणि त्याचवेळी तिथे संघर्ष निर्माण होत असतो.

*The Book of Life*, जानेवारी ६

# उत्कटतेने पाहा

मला असे वाटते की शिकणे हे विलक्षण कठीण आहे, तसेच ऐकणेदेखील कठीण आहे. आपण खऱ्या अर्थाने कधीच काहीही ऐकत नाही. आपल्याला माहीत असलेल्या गोष्टीच आपल्या कानात साठत जातात. त्यामुळे ऐकणे अतिशय कठीण होते. मला असे वाटते - खरंतर ही वस्तुस्थितीच आहे - आपण जर का आत्यंतिक उत्कटतेने, आपल्या सर्व शक्तिनिशी सगळी जीवनशैली ओतून एखाद्या गोष्टीचे श्रवण केले तर ते ऐकणेच आपल्या मुक्तीला कारणीभूत ठरू शकते. परंतु दुर्दैवाने तुम्ही कधीही निखळपणे ऐकत नाही. कारण त्याबाबत तुम्ही कधी काही शिकलाच नाहीत. शेवटी तुम्ही त्याच वेळी शिकता ज्यावेळी तुम्ही आपले सर्वस्व समर्पित करता. जेव्हा तुम्ही सर्वस्व अर्पून गणिताचा अभ्यास करता तेव्हाच तुम्ही गणित शिकता. परंतु ज्यावेळी तुमच्यामध्ये आंतर्विरोध असतो, ज्यावेळी तुम्हाला शिकायचे नसते, परंतु दबावाखाली शिकावे लागते तेव्हा ती केवळ संचय प्रक्रिया ठरते. शिकणे हे असंख्य चरित्ररेखा असलेली कादंबरी वाचण्यासारखे आहे. तुमचे पूर्ण लक्ष असण्याची आवश्यकता आहे. आंतर्विरोधातून लक्ष देणे नव्हे. जर तुम्हाला एखाद्या पानाबद्दल जाणून घ्यायचे असेल - वसंत ऋतुमधील किंवा ग्रीष्मातील पान - तर तुम्ही निखळपणे ते पानच पाहायला हवे. त्यातील सुसंगती, त्या पानाचे पोत, स्पर्श, त्या जिवंत पानाचे वैशिष्ट्य, तिथे सौंदर्य आहे, ऊर्जा आहे - त्या एका पानामध्ये सुद्धा जीवनरस आहे. म्हणूनच एखादे पान, फूल, एखादा ढग, सूर्यास्त किंवा एखादी व्यक्ती यांच्याबद्दल काही जाणून घ्यायचे असेल तर तुम्ही आत्यंनिक उत्कटतेने त्याचे निरीक्षण केले पाहिजे.

*The Book of Life*, जानेवारी ८

# ऋषी व्हॅली येथील वार्षिक संमेलन-२०१३

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे यंदाचे वार्षिक संमेलन ऋषी व्हॅली येथे २१ ते २४ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आले होते. सुमारे २५० शिबिरार्थी यात सहभागी झाले होते. *Living the Teaching in a Secular world* असा या संमेलनाचा विषय होता. आजच्या जगात कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचे स्थान काय आहे, याचा सर्व शिबिरार्थिंसमवेत मुक्तपणे वेध घेणे हा या संमेलनाचा उद्देश होता.

सुरुवातीला श्रीमती राधिका हर्झबर्गर यांनी संमेलनाच्या विषयावर विवेचन केले. जिथे माणसे धर्माच्या खऱ्या अर्थापासून दूर गेली आहेत, अशा या जगात कृष्णमूर्तींची शिकवण जगणे म्हणजे काय याची उकल करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एकूण सामाजिक व्यवहारांचा विचार केला तर त्यावर शासकीय कायदे, वैयक्तिक अधिकार आणि आर्थिक समृद्धीचे निकष यांचेच वर्चस्व दिसून येते. धर्माला इथे कोणतेही स्थान नाही. ही परिस्थिती लक्षात घेता पुढील प्रश्न समर्पक ठरतात. आजच्या जगात - जिथे धर्माला केवळ वैयक्तिक जीवनव्यवहारापुरते मर्यादित स्थान दिले गेले आहे तिथे आपण आध्यात्मिक जीवन कसे जगावे? आणि कृष्णमूर्तींची शिकवण फक्त वैयक्तिक जीवनव्यवहाराला लागू पडेल इतकी मर्यादित आहे का?

कृष्णजींचे जे पहिले भाषण ध्वनीचित्रमुद्रित केले गेले होते त्या मद्रास येथील ३१ डिसेंबर १९७८ रोजी झालेल्या भाषणाने संमेलनाची सुरुवात झाली. जीवनाच्या समग्रतेचे आकलन करून घेण्यासाठी कृष्णमूर्ती श्रोत्यांना बाह्य जगापासून सुरुवात करण्यास सांगतात. 'तुम्ही बाह्य जगापासून सुरुवात करून अंतरंगापर्यंत आले पाहिजे....' कृष्णमूर्तींच्या दृष्टीने बाह्य जग म्हणजे सुसंस्कारित संवेदनांना सहजपणे जाणवणारे जग नव्हे. तर विभिन्न आदर्शवादांच्या संघर्षातून ज्या जगाची जाणीव होते असे जग. उदाहरणार्थ, आपापल्या आदर्शवादाने झपाटल्यामुळे दुभंगलेली राज्ये दरवर्षी चाळीस हजार कोटी डॉलर्स युद्धसामग्रीवर खर्च करतात असे हे जग.

कृष्णमूर्तींच्या दृष्टीने अंतर्मनातील जग आणि बाह्य जग हे ऐकमेकांशी निगडित आहेत. विशाल सागराच्या लाटांचा खेळ असतो तसेच हे आहे. लाटेबरोबर पाणी पुढे येते आणि परत आतही सरते. याचा अर्थ असा नव्हे की बाहेरील जगात जे सारे काही चुकीचे घडत आहे, त्याला माणूस व्यक्तिश: जबाबदार असतो. परंतु व्यक्ती जेव्हा महत्त्वाकांक्षा, राग आणि स्पर्धात्मकता यांच्या प्रभावाखाली येऊन कृत्य करते तेव्हा ती जगाच्या अशा व्यापारामध्ये भागीदार असते.

कृष्णमूर्ती श्रोत्यांना कळकळीने बाह्य जगातील संघर्षमय विभाजनांची जाणीव करून देतात आणि मग आंतरिक जीवनाबद्दल शिकून घेण्याकडे वळतात, विशेषत: असे शिकणे ज्यात संचय करणे नसते. अत्यंत उत्कटतेने ऐकणे जेव्हा आपल्या साऱ्या नैसर्गिक क्षमतांमध्ये एकतानता असते. हा एक आगळाच मार्ग आहे- जेव्हा बुद्धी स्वायत्तपणे काम करत नसते, जेव्हा चित्त विचलीत होऊन भूतकाळाच्या आठवणी जागवल्या जात नसतात आणि मनामध्ये प्रेम असते; त्या श्रवणात अलिप्तता असते, एखाद्या पक्षाचा स्वर ऐकताना असते तशी. अशा प्रकारचे श्रवण म्हणजेच शिकणे असते आणि या मुक्तपणाबरोबर जगामध्ये बदल घडवून आणण्याची जबाबदारीही येते.

श्रोत्यांपुढे प्रश्न उभे राहतात: जे जग बऱ्याच प्रमाणात धार्मिक तत्वांच्या मर्यादेने जखडले आहे, अशा जगातली श्रवणप्रक्रिया कशी असते? ती केवळ एक खाजगी बाब असते का?

दुसऱ्या दिवशी सकाळी डॉ. पी. कृष्णा यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला धर्मातीत जगाच्या उदयाचे ऐतिहासिक समालोचन केले. धर्म आणि विज्ञान यामधील संघर्ष १६ व्या शतकात उद्भवला. १६ व्या शतकातील खगोलशास्त्रज्ञ गॅलिलिओ याने जेव्हा चर्चच्या तत्वप्रणालीला यशस्वीरित्या आव्हान दिले - त्यातील एक समज म्हणजे सूर्य पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालतो - तेव्हा चर्चच्या ठाम मतांपासून स्वतंत्र असे सत्याचे उगमस्थान त्याने प्रस्थापित केले. धर्माच्या ठाम मतप्रणालीचे उच्चाटन करीत निरीक्षण आणि प्रयोगशीलता यांनी सत्याचे स्वतंत्र निकष कसे प्रस्थापित केले हे डॉ. कृष्णा यांच्या ऐतिहासिक आढाव्यामुळे स्पष्ट झाले. गॅलीलिओच्या शोधानंतरच्या काळात विज्ञानाचा धर्मावर विजय होत गेला आणि त्यामुळे धर्मातील जगाची निर्मिती शक्य झाली. सत्य ही केवळ धर्माची मक्तेदारी नसते तर धार्मिक सत्याची कल्पनादेखील विवेक बुद्धीच्या तपासणी कक्षेमध्ये येते, असे जग म्हणजे धर्मातीत जग.

डॉ. कृष्णा यांनी या ऐतिहासिक चौकटीच्या संदर्भात कृष्णमूर्तींच्या विचारांचे परिक्षण केले आणि ही विचारधारा कोणत्याही परंपरागत तत्त्वांवर आधारित नसून तिच्यामध्ये सत्यशोधनाचा एक मार्ग या दृष्टीने आध्यात्मिकतेला स्थान दिले जाते हे स्पष्ट केले. वैज्ञानिक चिकित्सा आणि कृष्णमूर्तींना अभिप्रेत असलेला आध्यात्मिक शोध यांच्यामध्ये विरोधाभास नाही. हे दोन्हीही सत्यशोधनाचेच मार्ग आहेत. फक्त मानवी जीवनव्यवहाराच्या विभिन्न क्षेत्रांशी ते निगडित आहेत. या महत्त्वाच्या मुद्याकडे डॉ. कृष्णांनी शिबिरार्थींचे लक्ष वेधले.

यानंतर कृष्णमूर्तींनी २७ डिसेंबर १९८० रोजी मद्रास येथे केलेल्या भाषणाची ध्वनीचित्रफीत दाखविण्यात आली. या भाषणात 'उत्तरदायित्व - जबाबदारी' या संकल्पनेचा अगदी अनपेक्षित दृष्टीकोनातून विचार करण्यात आला आहे. या भाषणात कृष्णमूर्तींनी भारतावर लक्ष केंद्रित केले आहे आणि या देशाचा विनाश रोखणे ही भारतीयांची जबाबदारी कशी आहे यावर भर दिला आहे. एक राष्ट्रवादी या भूमिकेतून आपण बोलत नाही हे कृष्णमूर्ती या भाषणात पुन्हा पुन्हा स्पष्ट करतात. आपली भूमिका विषद करताना त्यांनी प्रामुख्याने भारतीय अशा आपल्या श्रोत्यांची जबाबदारी काय आहे हे स्पष्ट केले आहे. या देशाचे नागरिक या नात्याने या देशाचा विनाश रोखण्यासाठी आपल्याला काय करता येईल? या प्रश्नांकडे ते श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतात.

इथे कृष्णमूर्ती 'आपली जबाबदारी' असा शब्दप्रयोग करतात हे लक्षात घेतले पाहिजे. व्यक्तिगत पातळीवरून केलेला विचार त्यांना अभिप्रेत नसून अधिक विशाल दृष्टीकोनातून ते उत्तरदायित्व या संकल्पनेचा विचार करीत आहेत. आपल्या विचारव्यवहाराच्या केंद्रस्थानी 'मी-माझे' ही संकल्पना असते आणि त्यामुळे प्रत्येकजण दुसऱ्याशी झगडत असतो आणि म्हणून परस्परात संघर्ष, इतरांवर आपल्या दृष्टीकोनाचे महत्व ठसवणे यासारख्या गोष्टींना चालना मिळते; परंतु ते पुन्हा पुन्हा सांगतात. मुक्ती वैयक्तिक पातळीवर संभवतच नाही. उत्तरदायित्वाच्या संकल्पनेचा विचार करताना कृष्णमूर्तींनी ज्या पद्धतीने आपल्या प्रश्नाची मांडणी केली आहे त्यामधून त्यांना निव्वळ राष्ट्रवादी दृष्टीकोनच नव्हे, तर व्यक्तिवादी दृष्टीकोनही अभिप्रेत नाही हे स्पष्ट होते.

*इतिहासाच्या निरंतर वाहणाऱ्या प्रवाहात एखाद्या अडिग शिळेप्रमाणे टिकून राहणारी सत्वशील माणसे असली तरच भारताचा विनाश रोखणे शक्य आहे. ही उपमा जी त्यांनी दिलेली आहे त्यातून त्यांना अभिप्रेत असलेल्या दोन महत्त्वाच्या गोष्टी पुढे येतात. एक तर अडिगपणा–अभंगपणा आणि या अभंगपणामुळे आजूबाजूच्या भवतालात घडून येणारे परिवर्तन. त्या समुहातील प्रत्येक व्यक्ती स्वकेंद्रितपणापासून मुक्त झालेली असते किंवा नाही हे त्यांनी श्रोत्यांवर सोपवले आहे.*

*डॉ. कृष्णांनी जो विषय सुरू केला होता तो तिसऱ्या दिवशी श्री राजन चांडी यांनी पुढे नेला. त्यांनी धर्मातीत जग या संकल्पनेच्या संदर्भात आपली भूमिका मांडली. समाजाने धर्मगुरूंच्या वर्चस्वापासून मुक्ती मिळवली पण हे करत असताना समाज सत्वशीलता गमावून बसला. भौतिक कल्याणाचाच प्रामुख्याने विचार करत असताना समाज धर्मशील दृष्टीकोनात अध्याहृत असलेली सत्वशीलता गमावून बसतो. श्री चांडी म्हणतात की पारंपरिक भारतीय विचारधारेमध्ये मानवी जीवनाची उद्दिष्ट्ये स्पष्ट करताना धर्म (योग्य सत्वशील वर्तन, अर्थ (धन), काम (ऐंद्रिय सुख) आणि मोक्ष (मुक्ती) या गोष्टींना महत्त्व देण्यात आले आहे. जेव्हा जेव्हा काम किंवा अर्थ असा संघर्ष निर्माण होत असे त्यावेळी योग्य – सत्वशील वर्तनालाच मान्यता देण्यात येत असे. श्री. चांडी पुढे असेही म्हणाले की आधुनिक समाजांमध्ये धर्माला स्थान नाही आणि त्यामुळे ऐंद्रिय सुखामागे धावणे व संपत्तीसंचय या गोष्टींनाच मानवी जीवनात महत्त्व देण्यात येत आहे. धर्मातीत समाजाच्या या व्यक्तिकेंद्रित उद्दिष्टांमुळे हिंसा, वैविध्यपूर्ण प्रजातींचा विनाश आणि वैश्विक तापमानातील वाढ यासारख्या गोष्टींना चालना मिळत आहे.*

त्याच दिवशी कृष्णमूर्तींनी सानेन येथे ९ जुलै, १९७९ रोजी केलेल्या भाषणाची ध्वनीचित्रफित दाखविण्यात आली. या भाषणामध्ये कृष्णमूर्ती जगात बदल घडवून आणण्यासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन करतात. ह्यात ते तात्त्विक पातळीवर श्रोत्यांशी संवाद साधतात. श्रोत्यांपुढे त्यांनी ठामपणे एक अशक्यप्राय प्रश्नच ठेवला आहे: 'दोन प्रकारच्या विचारप्रक्रिया असतात. एखाद्या गोष्टीवर समस्येवर, एखाद्या वैयक्तिक बाबीवर विचार करणे किंवा एकूण जगाबद्दलच विचार करणे. म्हणजेच कोणत्या ना कोणत्या गोष्टीचा विचार करत राहणे. यापेक्षा अगदी वेगळी अशी – जी कोणत्याही गोष्टीला अनुलक्षित नसलेली अशी – विचारप्रक्रिया असू शकते का?

हा प्रश्न खरे तर सूचित आहे. विचारप्रक्रियेविषयी काही प्रयोग करणे इथे अपेक्षित आहे. 'कोणत्याही गोष्टीला अनुलक्षित नसलेली अशी विचारप्रक्रिया' या गोष्टीची उकल केल्याशिवाय समान पातळीवरून विचार करणे किंवा सर्वांसमवेत विचार करणे शक्य होत नाही, असे कृष्णमूर्ती ठासून सांगतात. ते म्हणतात, 'आपण विचार विनिमय करताना एकत्र येणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे तुमची विचारसरणी आणि माझी विचारसरणी, तिची किंवा त्याची विचारसरणी असा कोणताही अडथळा तिथे राहणार नाही. आपल्याला सर्वांना हे एकत्र करता येणे शक्य आहे का? कृष्णमूर्तींनी आधी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला होता. 'एखाद्या अडिग शिळेप्रमाणे टिकून राहणारी सत्वशील माणसे' असणाऱ्या गरजेवर त्यांनी लक्ष वेधले होते. इथे या मुद्याची ते आठवण करून देतात आणि सांगतात की सर्वांसमवेत विचार करणे आणि एकत्र येऊन काम करणे हे या मुद्याशी निगडित आहे. एकत्र येऊन सर्वांसमवेत विचार केल्यामुळे जगात बदल घडवून आणणे शक्य होते.

शेवटच्या दिवशी जी ध्वनीचित्रफित दाखविण्यात आली त्यात कृष्णमूर्तींनी श्रीमती पुपुल जयकर आणि इतर काही जणांबरोबर ऋषी व्हॅली येथे १९ डिसेंबर १९८४ रोजी केलेली चर्चा आहे. पहिल्या दिवशी दाखविलेल्या भाषणात कृष्णमूर्ती श्रोत्यांना 'बाह्य जगापासून सुरूवात करून अंतरंगापर्यंत जाण्या'बद्दल सांगतात. त्याच मुद्यावर ऋषी व्हॅली येथील या चर्चेमध्ये कृष्णमूर्तींनी विवेचन केले आहे. इथे 'बाह्य जग' म्हणजे विभिन्न आदर्शवादांच्या संघर्षातून ज्या जगाची जाणीव होते ते जग कृष्णमूर्तींनी अभिप्रेत आहे. या शेवटच्या दिवसाच्या ध्वनिचित्रफितीमधील संवादात ते वेगळ्या दृष्टीकोनातून विचार करण्याचा आरंभ नेमका कुठून करता येईल या विषयी चिंतन करतात. मानवी हस्तक्षेपामुळे तणावग्रस्त बनलेल्या जगाशी असलेले नाते पूर्णपणे त्यागून सर्व संवेदना एकवटून जगाचे निरीक्षण करणे. करुणा किंवा 'इतरांची आसवे पुसण्याची क्षमता' ही मात्र एक गूढ अशी गोष्ट राहते.

संमेलनाची सांगता श्री. कंदास्वामींच्या भाषणाने झाली. कृष्णमूर्तींची शिकवण समजून घेण्यामध्ये काय अडचणी येतात, याबद्दल ते बोलले. ज्या गावात ते लहानाचे मोठे झाले तेथील संस्कृतीचे त्यांनी रेखाटन केले. आधुनिक जीवनसरणीचा उदय होण्यापूर्वी ज्या तीन व्यक्तींचे गावातील एकून सांस्कृतिक वातावरणावर वर्चस्व होते, त्यांची व्यक्तिचित्रे त्यांनी श्रोत्यांपुढे उभी केली. आधुनिक युगाच्या आरंभापूर्वी भारतामध्ये जशी सदोष व्यक्तिमत्त्वाची माणसे होती, तशीच सद्गुणी माणसेही होती. परंतु गेल्या अर्धशतकात मात्र अतिशय महत्त्वाच्या अशा काही लक्षणीय गोष्टी आपण गमावून बसलो आहोत, असा मुद्दा त्यांनी मांडला. एक सुधारक असलेले तामिळ संत कवी रामलिंगम (ज्यांना वल्लालर या नावानेही ओळखले जाते) त्यांचा श्री. कंदास्वामींनी उल्लेख केला. त्यांनी म्हटले आहे, 'माझ्यापाशी माणके आहेत आणि पाचूही आहेत. पण त्यांचे मोल जाणणारा कोणी ग्राहक मात्र येत नाही.' श्री. राजन चांडी यांनी उल्लेख केलेला 'मुक्ती किंवा जीवनाचे अंतिम साध्य' हा मुद्दा इथे ध्वनित होता. श्री. कंदास्वामींनी सांगितलेल्या अवतरणामधून सूचित होत होते की मुक्तीचा शोधच मानवी जीवनाला अर्थ प्राप्त करून देतो.

संमेलनामधील वक्त्यांच्या भाषणांमधून कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीमधील गहन पैलूंवर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला गेला. कृष्णमूर्तींच्या वर्तमान काळातील आणि भविष्यकाळातील श्रोत्यांसाठी एक आव्हानात्मक अशी गोष्ट पुढे आली. आध्यात्मिक जीवनाचा विचार आता फक्त वैयक्तिक संदर्भातच केला जातो पण कल्पना, विचार, संपदा आणि निसर्ग यांच्याशी आपण योग्य नाते जोडल्यास आध्यात्मिक जगाची आजची व्याप्ती वाढू शकेल. डॉ. ॲनी बेझंट यांनी कृष्णमूर्तींना 'जागतिक मार्गदर्शक' (World Teacher) हे बिरुद बहाल केले होते. या बिरुदातून एक आव्हानही अध्याहृत होते. ते आव्हान पेलण्यासाठी आता साऱ्या जगानेच पुढे येण्याची गरज आहे.

– राधिका हर्झबर्गर

**आनंद विहार कृष्णमूर्ती अभ्यास केंद्र,** जांभिळघर, बदलापूर येथे निवासी व्यवस्थापक पाहिजे. जे. कृष्णमूर्ती यांच्या विचाराशी परिचित असलेल्या, बागाईत व शेतीकामाची पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीने आपले शिक्षण, वय, अनुभव व अपेक्षा या माहितीसह त्वरीत अर्ज करावा. निवृत्त व्यक्तीस प्राधान्य.
पत्ता: **अभिजित पडते**
२०१, उषश सोसायटी, लिंकींग रोड, एक्सटेन्शन,
शास्त्रीनगर समोर, सांताक्रुझ (पश्चिम) मुंबई ४०० ०५४.
दूरध्वनी : ९८१९७९९५७७/९८२०७७१२१८
इमेल: vasantipadte@gmail.com/ pvdabs@gmail.com

# श्रवण करणे म्हणजे काय, शिकणे म्हणजे काय आणि निरीक्षण करणे म्हणजे काय

श्रवण करणे म्हणजे काय, शिकणे म्हणजे काय आणि निरीक्षण करणे म्हणजे काय या संबंधी आपण प्रथम बोलावे. आपल्यापैकी बहुतेक जण क्वचितच ऐकतात. आपण श्रवणेंद्रियांनी ऐकतो आणि ते सर्वसाधारणपणे खोलवर आत झिरपत नाही. आपण जे ऐकतो त्याचे आपल्या भाषेत रूपांतर न करता ऐकणे, जे काही बोललं जातंय त्याचा अर्थ न लावता ऐकणे, मग तो आपला मित्र असो की नातेवाईक, किंवा एखाद्या पक्षाचा स्वर किंवा निर्झराची झुळझुळ असो, ते ऐकणे फार खोलवर जात नाही. तुम्ही एखाद्याचे विधान ऐकता, कोणीतरी तुम्हाला काही सांगतो किंवा वक्ता तुमच्याकरिता काहीतरी शोध घेत आहे, आपण एकत्र शोध घेत आहोत, तर मग आपले ऐकणे वरवरचे आहे का, की ऐकण्याची कृतीच आपल्या सगळ्या समस्यांची उकल करते. तेव्हा आपण कसे ऐकतो हे महत्त्वाचे आहे. फक्त आता जे बोलले जात आहे ते नव्हे परंतु ऐकणे, श्रवणाची कला, म्हणजे मग आपल्या श्रवणामध्ये फार मोठी संवेदनशीलता येते. जे असंबद्ध, वरवरचे असते ते आपण नाकारू शकतो, ते अगदी स्पष्ट आहे. परंतु ऐकतानाच्या क्षणीच जे असत्य आहे ते तत्काळ पाहणे, आणि जे सत्य असेल ते पाहणे, अनेक स्पष्टीकरणे दिल्याशिवाय, वर्णन, पृथक्करण न करता, परंतु अगदी श्रवणाच्या क्षणी त्या सत्याचे दर्शन होणे. आणि श्रवण करणे ही कदाचित फारच महान गोष्ट करणे असते. जर कोणी तुम्हाला सांगितले की, 'मी तुमच्यावर प्रेम करतो' तर तुम्ही ते कसे ऐकता? तुम्ही प्रत्यक्ष ते ऐकता का, की शंका घेता की त्याला काय पाहिजे आहे म्हणून तो असे म्हणतो आहे? त्याचा काय हेतू असेल? त्याची या शब्दाच्या मागे कोणती भावना असेल? तेव्हा व्यक्ती जी म्हणते, 'माझं तुमच्यावर फार प्रेम आहे,' तिची भावना आपण खरोखर टिपू शकत नसतो. मग जर आपण अशा प्रकारे ते ऐकले – श्रवण केले–तर आपल्या एकमेकांमध्ये तत्काळ संवाद सुरू होतो. मला शंका आहे तुमच्या बाबतीत असे घडले आहे का, इतके पूर्णपणे श्रवण करणे की संपूर्ण स्वर्ग तुमच्यासाठी खुला होतो.

आणि आपण शिकणे म्हणजे काय याचा सुद्धा विचार केला पाहिजे. तांत्रिक शिक्षणाशिवाय दुसरे काही शिकण्यासारखे असते का? भाषा शिकणे, विमान चालवायला शिकणे, पत्र लिहायला शिकणे या जीवनातील बऱ्यापैकी आवश्यक गोष्टी आहेत – त्यांची जरूरी आहे. पुस्तक कसे वाचावे, गाडी कशी चालवावी, चांगला सुतार कसे व्हावे, हे तुम्ही शिकता, ते ज्ञान मिळविता, साठवता आणि नंतर ते ज्ञान कुशलतेने काम करताना वापरता. ज्यावेळी आपण 'शिकणे' हा शब्द वापरतो त्यावेळी हेच आपण बहुतेकजण करीत असतो. माहिती आणि तंत्रज्ञान आपल्या मेंदूमध्ये साठवून ठेवतो – मेंदू नंतर ही माहिती आणि तंत्रज्ञान विशिष्ट दिशेने वळवतो. त्यानुसार आपण कृती करतो. शिकणे म्हणजे काय हे सर्वसाधारणपणे अशाच प्रकारे मानले गेले आहे. बाह्य शिक्षण– वातावरणाविषयी शिकणे, निरनिराळ्या गोष्टींविषयी शिकणे– हे परिघावरचे शिकणे असते. आता दुसऱ्या प्रकारचे शिकणे असते का? अशा प्रकारचे शिकणे आहे का की जे अनेक प्रकारच्या घटनांमधून आणि अनुभवांमधून मानसिकदृष्ट्या गोळा केले जाते, मानसिकदृष्ट्या साठवले जाते आणि नंतर आपल्या दैनंदिन जीवनातील परस्पर संबंधांमध्ये, ते ज्ञान मदत करू शकेल किंवा स्पष्टता आणू शकेल, असे शिकणे आहे का? माझा प्रश्न तुम्हाला समजतोय का?

आपल्यापैकी बहुतेक जण जसे तुम्ही आता कदाचित करीत आहात – आणि मला आशा आहे की तुम्ही तसे करीत नसाल – तुम्ही ऐकत आहात आणि शिकत आहात, शब्दाच्या साधारण अर्थाप्रमाणे, जे काही बोलले जात आहे, ते साठवले जात आहे आणि नंतर म्हणायचे 'होय, ते मला समजले आहे.' प्रथम ऐकणे, नंतर वस्तुस्थितीचे निरीक्षण करणे, किंवा जे बोलले जात आहे त्यातील असत्यता पाहणे आणि तुम्हाला जे वास्तव वाटेल त्यालाच चिकटून राहणे, त्यालाच धरून ठेवणे आणि मग त्यामधून कृती करणे आणि अधिकाधिक गोळा करीत जाणे. पुन्हा भाषा शिकताना किंवा तसेच काही करताना तोच घटनाक्रम अनुसरत जायचे. हीच शिकण्याची संपूर्ण प्रक्रिया असते.

आपण–तुम्ही आणि मी – प्रश्न विचारीत आहोत. माहिती गोळा करण्याशिवाय निराळ्या प्रकारचे निरीक्षण करणे असते का? कारण ज्या क्षणी आपण माहिती गोळा करतो आणि त्यामधून कृती करतो तेव्हा ते यांत्रिक बनून जाते. आपला मेंदू यांत्रिक झाला आहे. परंतु जेव्हा मेंदू या यांत्रिक विचाराच्या प्रक्रियेमधून मुक्त होतो, प्रतिक्रियांपासून, मग त्याच्याजवळ अपार ऊर्जा येते, असीम क्षमता, तंत्रज्ञानाच्या जगामध्ये मानवाने काय करून ठेवले आहे ते जरा पाहा. संगणकाच्या जगामध्ये, युद्धशास्त्राच्या जगामध्ये, दळणवळणाच्या क्षेत्रामध्ये इ. इ. कदाचित गेल्या शंभर वर्षांमध्ये प्रचंड तांत्रिक प्रगती झाली आहे. तेव्हा मेंदू असाधारण विलक्षण गोष्टी करण्यास सक्षम आहे. शास्त्रज्ञ असे म्हणत आहेत म्हणून कदाचित तुम्ही ते स्वीकाराल. हे उपरोधाने बोलले जात नाही आहे.

सानेन, जुलै १९८२

## श्रवणातून मुक्तीकडे

तुम्ही ज्यावेळी ऐकण्यासाठी प्रयत्न करता तेव्हा तुम्ही ऐकत असता का? तो प्रयत्नच ऐकण्याच्या आड येत नसतो का? ज्यावेळी एखादी गोष्ट ऐकण्यामध्ये सुख मिळत असते त्यावेळी तुम्ही प्रयत्न करीत असता का? जोपर्यंत तुमचे मन प्रयत्नपूर्वक कशात तरी गुंतलेले असते, स्पर्धेमध्ये असेल, कुठेतरी समर्थन करताना असेल, कुणाची तरी टीका करताना असेल, तोपर्यंत तुम्हाला सत्याची जाणीव होत नाही किंवा असत्य हे असत्य म्हणून दिसत नाही.

श्रवण करणे हीच मुळे एक पूर्ण कृती असते. श्रवणाची क्रियाच मुळी स्वत:ची मुक्ती घेऊन येते. परंतु ऐकण्याची तुम्हाला तळमळ आहे का? किंवा स्वत:मधील अस्वस्थता शमविण्याची कळकळ आहे का? जर तुम्ही ऐकाल... म्हणजेच जर तुम्ही तुमच्यामधील संघर्ष आणि आंतर्विरोध यांची जाणीव ठेवून, त्यांना कोणत्याही प्रकारे विचाराच्या विशिष्ठ साच्यामध्ये बंदिस्त न करता ऐकाल तर ते (संघर्ष – आंतर्विरोध) कदाचित पूर्णपणे शांत होतील. असे पाहा, आपण हे किंवा ते होण्यासाठी सतत प्रयत्न करीत असतो, एखादी अवस्था प्राप्त करण्यासाठी, एखाद्या प्रकारचा अनुभव घेण्यासाठी आणि दुसरा टाळण्यासाठी धडपड करीत असतो. म्हणजे मग मन सतत कुठेतरी गुंतलेले राहते. ते कधीच आपली स्वत:ची दु:खं आणि संघर्षांचे पडसाद ऐकण्यासाठी स्थिर नसते. साधे, सरळ राहा... आणि कोणीही बनण्याचा प्रयत्न करू नका किंवा कोणताही अनुभव घेण्यासाठी धडपडू नका.

*The Book of Life*, जानेवारी ५

# पुस्तक परिक्षण




शिक्षक, गुरू हे पुढच्या पिढीचे शिल्पकार असतात असे आपल्याकडे अनादिकालापासून मानले गेले आहे. परंतु कृष्णमूर्तींच्या दृष्टिकोनातून हे शिक्षक कसे असावेत याचे सखोल आणि मूलभूत विश्लेषण करणारे एक इंग्रजी पुस्तक *Educating the Educator* – *शिक्षकाला शिकविणे* – या नावाने कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाने अलिकडेच प्रकाशित केले आहे, त्याची ही ओळख.

कृष्णमूर्तींचा शिक्षणविषयक दृष्टिकोन पारंपरिक पद्धतीच्या शिक्षणापेक्षा निराळा होता आणि म्हणून त्यांनी भारतात तसेच परदेशात शाळा काढून शिक्षण क्षेत्रात प्रयोग करण्याचा प्रयत्न केला. या जगात शिक्षकांना प्रशिक्षित करणारी अनेक विद्यापीठे आहेत आणि या प्रशिक्षणातून विषयानुरूप प्राविण्य विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याचे तंत्र शिक्षकांना शिकविले जाते.

कृष्णमूर्तींच्या दृष्टीने हे 'शिकवण्याचे तंत्र' दुय्यम आहे. शिक्षकांच्या प्रज्ञेची वाढ होणे महत्त्वाचे असते. शिक्षक व विद्यार्थी यांमध्ये प्रेमाचे व मैत्रीचे संबंध असणे अपेक्षित असते. कृष्णमूर्ती म्हणतात, 'शिक्षकाने आपण का जगतो, का प्रयत्न करतो, का शिकतो, युद्धे का होतात, या सगळ्यांचा अभ्यास करून मुलांच्या प्रज्ञेला जागृत करणे हे त्यांचे मुख्य कार्य आहे. शिक्षकाने स्वत:मध्ये या प्रज्ञेची जोपासना केली नाही तर तो विद्यार्थ्यांना ती कशी देऊ शकणार? शिकवणे हे जगण्याचे साधन समजता नये.

कृष्णमूर्ती पुढे असे म्हणतात की शिक्षकाने समाजाच्या व समाजाच्या अपेक्षांच्या बाहेर जाऊन मुलांमध्ये प्रज्ञा फुलवली पाहिजे आणि शिक्षकांनी शिकवत असताना स्वत: सतत गांभीर्याने शिकत राहणे महत्त्वाचे आहे. कारण शिक्षकाने स्वत:मध्येच बदल घडवून आणणे अधिक महत्त्वाचे आहे. आजच्या कालबाह्य होत चाललेल्या शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणू इच्छिणाऱ्या शिक्षकांना, पालकांना, तसेच शिक्षण या विषयामध्ये रस असणाऱ्या अभ्यासकांना हे लहानसे १०० पानी पुस्तक निश्चितच नवीन दृष्टी देणारे आहे.

**Educating the Educator:** Rs. 25/-

## पडदे दूर सारणे

तुम्ही कसे ऐकता? संकल्पना मनात ठेवून, तुमच्या कल्पनांच्या प्रेक्षपणामधून, तुमच्या महत्त्वाकांक्षा, तुमच्या इच्छा, भीती, चिंता यांच्यासह तुम्ही ऐकता का? तुम्हाला जे ऐकायचे असते, तेव्हढेच तुम्ही ऐकता. तुम्हाला जे समाधान देते, खूष करते, जे तुम्हाला सोयीचे वाटते, असेच तुम्ही ऐकता. तुमचे दु:ख क्षणभर हलके करणारेच फक्त तुम्ही ऐकता. जर तुम्ही तुमच्या इच्छांच्या पडद्यामागून ऐकलेत तर तुम्हाला खचितच तुमचाच आवाज ऐकू येईल. इथे खरे तर तुम्हाला जे हवे आहे, ज्याची अपेक्षा आहे तेच तुमच्या कानी पडते. आणखी वेगळ्या प्रकारेही ऐकता येते का? काय बोलले जातेय, हे कसे ऐकावे याबरोबरच सर्वच गोष्टी कशा ऐकाव्यात हे जाणून घेणे महत्त्वाचे नाही का? – रस्त्यावरील आवाज, पक्षांची किलबिल, ट्रामगाडीचा आवाज, अस्वस्थ सागराची गाज, तुमच्या नवऱ्याचे बोलणे, बायकोचे बोलणे, मित्रांचे बोलणे, बाळाचे रडणे, हे कसे ऐकावे हे जाणून घेणे महत्त्वाचे नाही का? जेव्हा आपण आपल्या इच्छा प्रक्षेपित न करता ऐकत असतो तेव्हाच श्रवणाला महत्त्व येते. आपण ज्या पडद्याआडून ऐकत असतो ते सर्व पडदे दूर सारून निखळपणे श्रवण करणे शक्य आहे का?

*The Book of Life*, जानेवारी २

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,** वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८. • ईमेल: thestudykfi@yahoo.com • वेबसाईट: www.kfionline.org
कृष्णमूर्तींच्या भाषणांच्या आणि संवादांच्या अनेक डिव्हिडीज् आता आपण ऑर्डर पाठवून मागवू शकता. ही यादी वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू येथील अध्ययन कार्यशाळा:**
संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कॅंपस,१७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बेंगलुरू-५६००६२.
०६-०९ फेब्रु. २०१४ Reconnecting with Nature २०-२३ फेब्रु. २०१४ Individual Retreats
०६-०९ मार्च २०१४ Why do I get Angry? १०-१३ एप्रिल २०१४ Karnataka JK Adhyayana Shibira: Understanding Relationship
दूरध्वनी: ०८० - २८४३५२४३ • ईमेल: kfistudy@gmail.com • वेबसाईट: www.kfistudy.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी :** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ - २४४१२८९ / २४४०४५३ • ईमेल: kcentrevns@gmail.com • वेबसाईट: www.j-krishnamurti.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री** पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३,महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, ऋषी व्हॅली,** जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश - ५१७३५२
दूरध्वनी : (०८५७१) २८०३७/६८६२२/६८५८२ • ईमेल: study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी,** पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी - २४९१५१.
२७ फेब्रु. ते ०५ मार्च २०१४ http://jkrishnamurtionline.org/info/STUDY'RETREAT'Feb'Mar'2014'vkc.pdf
ईमेल: krc.himalay@gmail.com • दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९०
वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता,** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता - ७०००१९.
दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल: kfikolkata@gmail.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक** - ओरिसा, पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक - ७५३००९, ओरिसा.
दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल: kficuttackcentre@sify.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर :** आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र. • दूरध्वनी: (०२२) २५०१४०९४, २४२२३१९९ • ई मेल: zilog@vsnl.com

# शिकणे हा अनुभव नव्हे

शिकणे हा शब्द मोठा अर्थसूचक आहे. दोन प्रकारची विद्यार्जने असतात. आपल्या बहुतेकांसाठी शिकणे म्हणजे माहिती, ज्ञान गोळा करणे, अनुभव, तंत्रज्ञान, कुशलता गोळा करणे असते. मानसिकदृष्ट्या शिकणे सुद्धा असते. अनुभवामधून जे शिकणे असते ते जीवनाचे तात्काळ अनुभव असतात, जे समाज, वर्ण, परंपरा, या माध्यमातून अंशत: तुमच्यापर्यंत येत असतात. त्यामधून शिकणे घडते. जीवनाला सामोरे जाण्यासाठी दोन प्रकारचे शिकणे असते. मानसिकदृष्ट्या आणि भौतिकदृष्ट्या. बाहेरचे कौशल्य आणि आतील कुशलता. खरे तर या दोघांमध्ये तसा काही फरक करता येणार नाही. ते एकमेकात मिसळून गेलेले असतात. सध्या आपण कृतीमधून शिकण्याच्या कौशल्याच्या तंत्रज्ञानाचा विचार करीत नाही. अभ्यासामधून शिकता येणाऱ्या तंत्रज्ञानाचा विचार करीत नाही. आपण ज्यासंबंधी विचार करीत आहोत ते मानसिकदृष्ट्या शिकणे. म्हणजे शतकामधून जमविलेली माहिती, ज्ञान किंवा परंपरेमधून संक्रमित केलेले अनुभव याला आपण शिकणे म्हणतो. पण याला शिकणे म्हणणे यालाच मुळी मी प्रश्न करीत आहे. मी एखादे कौशल्य शिकण्यासंबंधी बोलत नाही. भाषा, तंत्रज्ञान वगैरे. परंतु मी असे विचारीत आहे की मन कधीतरी मानसिकदृष्ट्या शिकत असते का? ते शिकलेले आहे. आणि जे ते शिकलेले आहे त्याने ते जीवनाच्या आव्हानांना सामोरे जात असते, ते जे शिकलो आहे त्याच्या आधारानेच ते जीवनाचा अर्थ लावत असते. त्याच आधारावर नवीन आव्हानांना तोंड देते. आपण हेच करीत आलो आहोत. त्याला शिक्षण म्हणावे का?

शिक्षण म्हणजे काहीतरी नवीन शिकणे नव्हे का? काहीतरी जे मला माहीत नाही आणि ते मी शिकत आहे. मला जे माहीत आहे त्यातच मी जर भर घालीत राहिलो तर ते शिकणे राहत नाही.

*The Book of Life*, जानेवारी १०

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड,
चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : ०४४ २४९३ ७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र:**

हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.
संपर्क :- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
मुंबई एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल,
मुंबई-४०००००६.
दूरध्वनी - ०२२ २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

# शब्दांच्या नादापलिकडे

एकणे ही एक कला आहे जी सहजासहजी आत्मसात होणारी नसते. पण तिच्यामध्ये सौंदर्य आणि अपार समज आहे. आपल्या जगण्याच्या अनेकविध पातळीवर आपण ऐकत असतो. परंतु आपले ऐकणे हे नेहमीच आपल्या पूर्वसंस्कारांनी सीमित झालेले असते. किंवा एखाद्या विशिष्ट दृष्टीकोनाने स्वत:च्या विचारांच्या साखळीचा, निष्कर्षांचा नेहमीच अडथळा उभा राहत असतो. ऐकण्यासाठी आपल्या आंतर्यामी पूर्ण शांतता हवी, काहीतरी मिळण्याच्या धडपडीपासून मुक्ति हवी, शांतपणे अवधान हवे. ह्या जागरूक अशा मनाच्या अवस्थेमध्ये शाब्दिक निष्कर्षांच्या पलिकडे जाऊन श्रवण करणे शक्य होते. शब्द भ्रम निर्माण करतात. ते फक्त बाहेरील संवाद साधण्याचे साधन असतात. परंतु शब्दांच्या नादापलिकडे संवाद साधण्यासाठी तेथे ऐकण्यामध्येच मनाची जागरूक तटस्थ अशी अवस्था पाहिजे. जे प्रेम करतात ते ऐकू शकतील. परंतु असा श्रवण करणारा सापडणे ही अगदी दुर्मिळ गोष्ट असते. आपल्यापैकी बहुतेक जण फलितांच्या मागे असतात. ध्येय गाठण्यासाठी धडपडणे, जिंकण्याच्या मागे, विजयाच्या किंवा यशाच्या मागे आपण नेहमीच धावत असतो आणि म्हणून खऱ्या अर्थाने ऐकणे होत नाही. निखळ श्रवणामध्येच आपल्याला शब्दांचे गाणे ऐकायला येते.

*The Book of Life*, जानेवारी ३

**कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस्:**

www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.rishivalley.org
www.j-krishnamurti.org
www.kfistudy.org
www.kscskfi.com
www.jkrishnamurtionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006. Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net ● Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*